**विषयः-** मालकी क्षेत्रातील वृक्षतोडीचे प्रकरणा संदर्भात वारंवार वाढत्या तक्रारी लक्षात घेता महाराष्ट्र झाडे तोड नियमन अधिनियम 1964 अंतर्गत तरतुदीची योग्य अंमलबजावणी होण्या करीता मालकी क्षेत्रातील वृक्षतोडीवर निर्बंध घालणे, स्थाई आदेश निर्गमित करणे इ. बाबत.

## टिप्पणी

मुख्य वनसंरक्षक कार्यालय यवतमाळ ( तत्कालीन वनसंरक्षक यवतमाळ यांचे कार्यालय ) यांचेकडुन महाराष्ट्र झाडे तोड नियमन 1964 अंतर्गत तरतुदीची योग्य अंमलबजावणी करण्याकरीता खालील प्रमाणे वेळोवेळी स्थाई आदेश / आदेश निर्गमित करण्यांत आले आहेत.

संदर्भः-

1) स्थाई आदेश कक्ष-2/दक्षता/2176 दिनांक 19/6/90
2) कक्ष-2/दक्षता/2606 दिनांक 20/8/98
3) कक्ष-4/महसुल/7796 दिनांक 1/2/2000
4) मुवसं(य)/कक्ष-3/दक्षता/760 दिनांक 20/3/07
5) परिपत्रक क्रमांक ब/मुवसं(य)/कक्ष-4/महसुल/2673 दिनांक 31/7/08

## कार्यपध्दती

**संदर्भ १**

1. मुख्य वनसंरक्षक यवतमाळ यांचे स्थाई आदेश क्र.1 (कक्ष-2/दक्षता/2176 दिनांक 19/6/90) नुसार ठरवून दिलेल्या कार्यप्रणाली प्रमाणे या वनवृतात खाजगी क्षेत्रातील वृक्षतोड प्रकरणे हाताळली जातात. कार्यप्रणालीची विभागणी पुढील 5 टप्यात दर्शविल्याप्रमाणे करण्यांत येते.

| | |
|---|---|
| 1) अर्जदारांचे अर्ज नोंदणी | नमुना क्र.1 प्रपत्र अ |
| 2) वृक्षतोड करणेपुर्वी बाळगावयाची दक्षता | प्रपत्र 2अ, 3 अ, 3ब, 3क व 3ड |
| 3) वृक्षतोड आदेश पारीत करणेपुर्वी बाळगावयाची दक्षता व कार्यसंहीता | परिपत्रक 4, प्रपत्र 4अ व प्रपत्र 5 |
| 4) वृक्षतोड झाल्यानंतर वनोपजाची निर्गत | प्रपत्र क्र.5अ, 6, 6अ व 7 |

1) अर्जदाराचे अर्जाची नोंदणीः- महाराष्ट्र झाडे तोडणे विनियमन 1964 च्या कलम 3 (1) नुसार वृक्षतोड करण्याची परवानगी मिळणेबाबतचा अर्ज त्या क्षेत्राचा 7/12 चा उतारा, तलाठी अहवाल, मंडल अधिकारी यांचा सिमांकन अहवाल, गटाचे रेखचित्र, गांव नकाशा व उभ्या झाडांची यादी यासह संबंधीत परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल तथा वृक्ष अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करतात.

2) प्रपत्र अ कागदपत्राची तपासणी :- परिक्षेत्र कार्यालयास प्रकरण प्राप्त झाल्यानंतर जोडलेल्या कगदपत्राची तपासणी करुन तोड करावयाच्या वृक्षावरील मालकी हक्काची खात्री केल्यानंतर जाहीरनामा काढण्यांत येतो त्या जाहीनाम्याची प्रत संबंधीत गावांचा ग्रामपंचायतीस दिला जातो. कोणाचे काही हितसंबंध असल्यास विहीत कालावधीत आक्षेप मागविले जातात विहीत मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास प्रकरण क्षेत्रीय कार्यवाही करीता क्षेत्र सहाय्यक (वनपाल) यांचेकडे क्षेत्र तपासणी करीता पाठविले जातात.

3) प्रपत्र 2अ प्राथमिक क्षेत्राची तपासणी :- क्षेत्रीय तपासणी करतांना तोडी करीता दर्शविलेल्या झाडांची क्षेत्राप्रमाणे खात्री केली जाते, वृक्षांची यादी तपासली जाते सदर क्षेत्राला लागून असलेल्या शेतक-यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन पंचानाम्यासह प्रकरण वृक्ष अधिकारी (वनक्षेत्रपाल) यांचेकडे सादर केले जाते.

4) प्रपत्र 3 अ :- सदर प्रकरण वनक्षेत्रपाल यांचेकडून प्राथमिक क्षेत्र तपासणी करुन विभागिय कार्यालयाचे कक्ष अधिकारी यांचेकडे कागदपत्राच्या तपासणी करीता प्रकरण पाठवितात.

5) प्रपत्र 3ब / 3क :- कक्ष अधिकारी प्रकरणातील संपूर्ण दस्ताऐवजाची पाहणी करुन सरकारी जंगल सदर क्षेत्रास लागून असल्या प्रकरणी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडुन क्षेत्राची मोजणी झाल्याची खात्री करतात. अशा प्रकरणात विभागिय कार्यालयातील वनसवर्हेक्षक पाठवून सरकारी क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांचे सिमेवरील वृक्ष प्रतिबंधीत करतात जेणेकरुन शासकीय क्षेत्रातील कोणत्याही वृक्षांची तोड अनावधानानेसुध्दा संबंधीत कास्तकाराकडून होणार नाही याची दक्षता घेण्यांत येते. त्यानंतर सदर प्रकरण वनक्षेत्रपाल तथा वृक्ष अधिकारी यांचेकडे पाठविले जाते.

6) प्रपत्र 3 ड :- परिक्षेत्र कार्यालयात प्रकरण प्राप्त झाल्यानंतर वनक्षेत्रपाल क्षेत्र निरीक्षण व उभ्या झाडांचे मोजमाप यांची खात्री करुन परिपक्व झाडांच्या तोडीकरीता नाहरकत अहवाल प्राप्त करण्याकरीता संबंधीत सहा.वनसंरक्षक यांचेकडे प्रकरण सादर करतात.

7) प्रपत्र 4 :- सहा.वनसंरक्षक परिपक्व अनुसुचित झाडांच्या वृक्षतोडीला नाहरकत प्रमाणपत्र देऊन प्रकरण परत वनक्षेत्रपाल तथा वृक्ष अधिकारी यांचेकडे पाठवितात.

8) प्रपत्र 4अ :- महाराष्ट्र वृक्षतोड आदेश 1964 च्या कलम 3 (1) अन्वये अर्जदाराला त्याठिकाणी किंवा अन्य ठिकाणी परवानगी मागितलेल्या झाडांच्या संख्येइतकी कमीतकमी झाडे लावण्याची लेखी हमीपत्र संबंधीत अर्जदाराकडून लिहून घेतात.

9) प्रपत्र 5- वृक्षतोड आदेश :- सहाय्यक वनसंरक्षक यांनी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राचे अधिन राहून वृक्ष अधिकारी वृक्षतोडीचे आदेश जारी करतात.

10) प्रपत्र 5 अ :- वृक्षतोडीच्या आदेशानंतर संबंधीत शेतकरी वृक्षांची तोड करुन पंचनामा व लॉगींग यादीसह उत्पादीत मालाचे पासिंग करण्याकरीता पासींग हॅमर जारी करणे व वाहतुक पास मिळणे याकरीता संबंधीत वृक्ष अधिकारी यांचेकडे अर्ज करतात.

11) अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रकरणे क्षेत्रीय तपासणीकरीता मालाचे उत्पादनाचे खात्री करण्याकरीता संबंधीत वनपालाकडे पाठविला जातो. उत्पादीत मालाचे वनपाल खात्री करुन पंचनाम्यासह संपूर्ण प्रकरण वनक्षेत्रपाल यांना सादर करतात. वनक्षेत्रपाल यांचे क्षेत्रीय तपासणी नंतर उत्पादीत मालाची खात्री केल्यानंतर उत्पादीत मालाचे पासींग करण्याकरीता प्रकरण संबंधीत सहा.वनसंरक्षक यांचे मार्फत विभागिय कार्यालयास सादर करतात.

12) प्रपत्र 6 :- वनोपज निरीक्षण व पासींग करण्याचे आदेश

विभागिय कार्यालयाकडून प्रकरणी वनोपज पासींग करण्याकरीता पासींग हातोडा संबंधीत सहा.वनसंरक्षक यांना दिला जातो.

13) प्रपत्र 6 अ :- सहा.वनसंरक्षक विभागीय आदेशाप्रमाणे उत्पादीत मालाचे व थुटाचे पासिंग करुन वनोपज वैध असल्याचा पासींग अहवाल उपवनसंरक्षक यांचेकडे सादर करतात.

14) प्रपत्र 7 :- सहा.वनसंरक्षक यांचेकडून वनोपज निरिक्षण व पासींग अहवाल प्राप्त झाल्यानंतर विभागिय स्तरावरुन वनोपज निर्गत करण्याकरीता निर्गत आदेश जारी करतात.

**संदर्भ** 2 :- शासकीय वनक्षेत्रालगतच्या मालकी प्रकरणाची तपासणी वनक्षेत्रपाल फिरते पथक यांचेकडून करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

**संदर्भ** 3 :- नाहरकत प्रमाणपत्र दिलेल्या वृक्षांचा अ.क्र. वेढीवर्गासह प्रपत्र 4 मधे देण्याबाबत सुचना जारी करण्यांत आल्या तसेच प्रपत्र-5 मधील वृक्षतोडीच्या आदेशात वृक्षाचा क्रमाकं नमुद करण्याबाबत सुचना देण्यांत आल्या.

वृक्षतोडीच्या आदेशा प्रमाणे सहा.वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल फिरते पथक यांना पृष्ठांकित करण्याच्या सुचना देण्यांत आल्या व वनक्षेत्रलगतच्या मालकी प्रकरणाची पाहणी वनक्षेत्रपाल फिरते पथक यांनी करण्याबाबत सुचना देण्यांत आल्या.

**संदर्भ** 4 :-

1) मालकी प्रकरणातील खाजगी क्षेत्रातील वृक्षतोडीच्या प्रकरणात सिमांकनाची जबाबदारी बीट वनरक्षकाची दर्शविण्यांत आली आहे तसेच त्याअनुषंगाने कुपाचे सिमांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत सुचित करण्यांत आले आहे.

2) बिगर आदीवासी खाजगी क्षेत्रातील वृक्षतोड प्रकरणात लगतचे क्षेत्र आदीवासी भोगवटदाराचे असल्यास तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडून सिमा निश्चित करण्याकरीता सिमांकन आवश्यक करण्यांत आले आहे.

3) क्षेत्रनिहाय तोडावयाचे वृक्ष वनशास्त्रदृष्टया परिपक्व असल्याबाबतचा अभिप्राय सहा.वनसंरक्षक यांनी द्यावे.

4) मालकी प्रकरणापैकी 5% प्रकरणाची तपासणी उपवनसंरक्षक यांना बंधनकारक करण्यांत आली आहे.

5) उपवनसंरक्षक यांनी जारी केलेल्या निर्गत आदेशाची प्रत मुख्य वनसंरक्षक यवतमाळ यांना सादर करावी.

**संदर्भ** 5 :-

1) या कार्यालयाच्या कार्यप्रणालीची काटेकोर अंमलबजावणी करावी
2) क्षेत्रीय तपासणी नंतरच नाहरकत किंवा परिपक्वता इ. बाबत अहवाल द्यावा.
3) सहा.वनसंरक्षक यांनी स्वतःचे उपस्थितीत वनोपजाचे पासींग विभागिय कार्यालयाने जारी केलेल्या पासींग हातोडयाने करावे.
4) विभागिय कार्यालयाने पासींग हातोडा सुरक्षिततेवर उपवनसंरक्षक यांनी स्वतः नियंत्रण ठेवून पासींग हातोडयाचा गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी.
5) उपवनसंरक्षक यांनी मालकी प्रकरण तपासणी केल्यानंतरच वाहतुक परवाना जारी करावा.
6) लोकांचे अहित होणार नाही व परवानगीशिवाय झाडे कापले जाणार नाही याची जरुरी दक्षता घेण्यांत यावी. सोबत संदर्भ 1 ते 5 चा संच माहितीकरीता दोन प्रतीत देण्यांत येत आहे.

या वनवृत्तात मागील 3 वर्षात महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम 1964 अंतर्गत परवानगी दिलेल्या मालकी प्रकरणाचा तपशिल सोबतच्या प्रपत्रात दर्शविण्यांत आला आहे.

परवानगी दिलेल्या मालकी प्रकरणांची संख्या व मालकी प्रकरणात प्राप्त झालेल्या तक्रारी यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे अशा तक्रारीची वेळोवेळी दखल घेऊन नियमाप्रमाणे जरुरी कार्यवाही करण्यात येते. या वृत्तातील मालकी प्रकरणा संबंधाने जारी केलेल्या स्थायी आदेश/आदेश यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन मालकी क्षेत्रातील तक्रारीवर प्रतिबंध/नियंत्रण ठेवले जाते

वनसंरक्षक, यवतमाळ वनवृत्त, यवतमाळ यांचे कार्यालय.

स्थायी आदेश.

क्रमांक : (1) दि.19 जुन 90 कक्ष-2/दक्षता/2176 दि. 19 जुन,1990

विषय :- मालकी प्रकरणात झाडे कटाई बाबत.

सद्यःस्थितीत इमारती नगाच्या वाढत्या किंमती लक्षांत घेउन मालकी खातेदार त्यांच्या मालकीच्या जमीनीवरील झाडे वनकंत्राटदारामार्फत तसेच आदिवासी प्रकरणामध्ये शेती करण्यांच्या सबबीवर झाडे तोडण्यांची परवानगी मंजूर करण्याबाबत प्रकरणे होत आहे.

2) सर्वसाधारणपणे असे निदर्शनास आले आहे की, मालकी शेतातील झाडे कटाईच्या प्रकरणांत महाराष्ट्र झाडे तोड अधिनियम, 1964 तसेच महाराष्ट्र वनजमीन महसूल संहिता 1966 च्या कलम 25 यात अभिप्रेत असलेल्या नियमांची काळजी व खबरदारी व्यवस्थीत पार पाडली जात नाही.

3) महाराष्ट्र राज्य झाडे तोड अधिनियम,1964 ला नुकतीच महाराष्ट्र ॲक्ट नं. 26/89 नुसार सुधारणा करण्यांत आली व त्यानुसार वृक्षतोड करण्यासाठी आदेश पारीत करण्यांचे अधिकारी वनाधिका-याकडे आले आहेत. यामुळे वनाधिका-यावर जास्त जबाबदारी येउन पडली आहे.

4) राजस्व खात्याकडे असलेले अधिकार वनाधिका-याकडे आल्यामुळे यापुढे मालकी खस-यासंबंधीची प्रकरणे अधिक न्याय व तारतम्य बाळगुन हाताळल्या जातील. या दृष्टीने नविन अधिकार वापरले जातील अशी अपेक्षा आहे. एखाद्या मालकी प्रकरणांत झालेल्या अवैधते बाबत या अगोदरच राजस्व व वनविभाग यांची संयुक्त जबाबदारी अभिप्रेत होती ती आता केवळ वनविभागावरच पुर्ण जबाबदारी समजण्यांत येईल. तेव्हा एखाद्या मालकी प्रकरणात वनोपजाला वाहतुक परवाना देतांना किंवा वनोपज निर्गत करतांना होणारी अनियमितता किंवा अवैधा-निकता ही आता सर्वस्वी वनखात्याचीच जबाबदारी राहणार आहे. तेव्हा मालकी प्रकरणे हाताळतांना वनाधिका-यांनी काटेकोरपणे नियमांचे जर पालन केले तर मालकी प्रकरणे योग्य रितीने हाताळता येतील.

5) आता वनविभागाचा संबंध फक्त वाहतुक परवान्याशिच राहीला नसल्यामुळे मालकी प्रकरणाचा निपटारा लावतांना सर्व बाबींवर सखोल विचार करुन योग्य तो निर्णय घेणे ही वनधिका-यांचीच जबाबदारी आहे.

6) महाराष्ट्र झाडे तोड अधिनियम,1964(सुधारणा) 1989 अंतर्गत तरतुदीनुसार अनुसुचित झाडे तोडण्यासाठीच वनाधिका-याला अधिकार प्रदान करण्यांत आले आहेत याची त्यांनी नोंद घ्यावी.

7) वनपरिक्षेत्र अधिका-याला महाराष्ट्र ॲक्ट नंबर 26/89 महाराष्ट्र राज्य झाडे तोड (सुधारणा) अधिनियम, 1989 नुसार धवृक्ष अधिकारीध म्हणून सुध्दा काम करावयाचे आहे व त्यामुळे एकाच अधिकाऱ्याला दोन पदाच्या अधिकाराची अंमलबजावणी करतांना दिलेले अधिकार एक दुसऱ्या पदाला पुरक असावेत याच पध्दतीने वापरावे लागतील वृक्ष अधिकारी, म्हणून झाडांची तोड करण्यास काढलेला आदेश वनपरिक्षेत्रअधिकारी यालाच योग्य प्रकारे अंमलात आणावयाचा आहे व यामुळे वृक्ष अधिकारी तसेच वनपरिक्षेत्राधिकारी या दुहेरी भुमीका पार पाडतांना वनपरिक्षेत्राधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी येउन पडली आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे वनपरिक्षेत्राधिकारी यांना महाराष्ट्र राज्य झाडे तोड अधिनियम, (सुधारणा) 1989 अन्वये पोट कलम 1 चे अंतग्रत 3 प्रमाणे वृक्ष अधिकारी, म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे व वृक्ष अधिकाऱ्यांच्या मर्यादा त्यांच्या क्षेत्रा पुरत्याच मर्यादित आहेत.

8) मालकी खसऱ्यांची प्रकरणे यवतमाळ वनवृत्तांत हाताळतांना संपुर्ण वृत्तात एक एकरुन पध्दत असावी त्या दृष्टीने निरनिराळे प्रपत्रे प्रस्तावित केलेली आहेत ती सर्व या पत्रा सोबत जोउली आहेत.

9) सर्व उपवनसंरक्षक/विभागीयवन अधिकारी, प्रादेशीक विभाग तसेच त्यांच्या अधिनिस्त सर्व कर्मचा-यांना सुचीत करण्यांत येते की, ह्या वृत्तामार्फत प्रस्तावित करण्यांत आलेली पध्दत सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे अंमलात आणावी. निरनिराळ्या स्तरावर अधिकाऱ्यांची जी जबाबदारी नेमुन दिलेली आहे, त्यानुसार त्यांनी आपली कार्यवाही करावी. या घालुन दिलेल्या पध्दतीच्या विपर्यस्त अंमलात येणाऱ्या पध्दतीला या कार्यालयाची अनुमती नाही व अशा विपरीत पध्दतीने मालकी प्रकरणे हाताळली गेली तर संबंधीत अधिकारी व कर्मचारी जबाबदार राहतील.

उपवनसंरक्षक/वि.व.अ./सहाय्यक वनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी, स्तरावर मॉनीटरिंग रजिष्टर असावे व ते योग्य प्रकारे भरले जावे याची संबंधीत अधिका-यांची जबाबदारी राहील. मॉनिटरींग रजिष्टरचे प्रपत्र कसे असावे याचा नमुना या पत्रासोबत जोडलेला आहे. उपवनसंरक्षक/वि.व.अ. प्रादेशीक यांना सुचित करण्यांत येते की, त्यांना त्यांच्या कार्यालयातील विभिन्न स्तरावर धमॉनिटरींग रजिष्टरध उघडून मालकी प्रकरणांची अद्यावत माहीती ठेवावी.

सहपत्र :- 1) शेत प्रकरणात वृक्षतोड करण्यांची कार्यप्रणाली
2) मॉनिटरींग रजिष्टरचे प्रपत्र
(सर्व स्तरावरील)
एकूण पाने 1 ते

स्वा/-
(सु.पु.केळकर)
वनसंरक्षक,
यवतमाळ वनवृत्त, यवतमाळ.

प्रति,

उपवनसंरक्षक (प्रादेशीक)

विभागीय वनअधिकारी सर्व (प्रादेशीक)

सहाय्य वनसंरक्षक (सर्व)

वनपरिक्षेत्र अधिकारी सर्व ( प्रादेशीक )यांना माहिती व योग्य अंमलबजावणीसाठी अग्रेषीत.

**प्रपत्र-1**

मालकी खसरा प्रकरणात विभागीय वन अधिकारी/उपवनसंरक्षक यांनी विभागीय कार्यालयात ठेवावयाचे मॉनीटरींग रजिष्टरचे प्रपत्र

| अ. क्रं. | वनपरिक्षेत्र | नोंदणी प्रकरण क्रमांक | शेतमालकाचे/ खसराधारकाचे नांव व गांव | खसरा क्रमांक व गांव | राजस्व क्रमांक | प्रकरण विभागीय कार्यालयात प्राप्त झाल्याची तारीख | प्रकरणावर शिफारस पत्र जारी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |

| प्रकरणावर प्रपत्र-5 नुसार (वृक्षतोडीचा आदेश ) क्रमांक व तारीख | प्रकरणावर प्रपत्र-6 नुसार वनोपज निरिक्षण व पासींग करण्यांचे आदेश दिल्याचा आदेश क्रं. व दिनांक | प्रकरणात 6 अ नुसार वनोपज निरिक्षण व पासींग अहवाल प्राप्त झाल्याचा क्रमांक व दिनांक | प्रकरणात प्रपत्र-7 नुसार वनोपज निर्गत करण्यांचे अंतिम आदेश दिल्याचा क्रमांक व दिनांक | प्रकरणात व.प.अ. कडून अंतिम पुर्तता अहवाल प्राप्त झाल्याचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | |

**प्रपत्र-2**

मालकी प्रकरणात सहाय्यक वनसंरक्षक (कक्ष अधिकारी) यांनी ठेवावयाचे मॉनीटरिंग रजिष्टरचे प्रपत्र

| वनपरिक्षेत्र | प्रकरण क्रमांक व दिनांक (वर्षे) | शेतमालकाचे नांव/ खसराधारकाचे नांव व गांव | खसरा क्रमांक | व.प.अ. यांचेकडून प्रपत्र क्रमांक धअध व 2 अ प्राप्त झाल्याची तारीख | प्रकरण वि. व. अ. /उप व. सं. यांना शिफारशीसहीत पाठविल्याचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

**प्रपत्र -3**

मालकी खसरा प्रकरणात वन परिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात ठेवावयाचे मॉनीटरींग रजिष्टरचे प्रपत्र

| प्रकरण क्रमांक वर्ष | प्रकरण प्राप्तीचा क्रमांक व दिनांक | शेतमालकाचे /खसराधारकाचे नांव व गांव | खसरा क्रमांक व गांव | राजस्व क्रमांक | वन परिक्षेत्र | प्रपत्र क्रमांक -2 (अ) नुसार सहाय्यक उपपरिक्षेत्र अधिकारी यांना प्रकरण प्राथमीक तपासणी करिता पाठविण्यांचा क्रमांक व तारीख | प्रकरण सहाय्यक उपपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडुन तपासणी होउन प्राप्त झाल्याचा क्रमांक व तारीख | प्रकरणातील प्रपत्र-4 प्राप्त झाल्याचे क्रमांक व तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

| प्रकरण स.व.स./ संलग्न अधिकारी यांना पाठविल्याचा क्रमांक व तारीख | प्रकरणात तोडीस शिफारस केलेल्या झाडांचा तपशिल | | तोडीचे आदेश दिल्याचा क्रमांक व तारीख |
|---|---|---|---|
| | जात | संख्या | |
| 10 | 11 | | 12 |
| | | | |

**शेतमालकी प्रकरणात होणा-या वृक्षतोडी संबंधी विहित कार्यप्रणाली व मार्गदर्शक तत्वे.**

1) अनुक्रमणिकाः-
प्रकरण 1 ले :- वृक्षतोडी संबंधी अस्तित्वात असलेल्या कायदे व नियमावलीबाबत.
अ) महाराष्ट्र राज्य झाडे तोड अधिनियम,1964 (मुख्य अधिनियम)
ब) महाराष्ट्र राज्य झाडे तोड अधिनियम (सुधारणा) 1980 महाराष्ट्र ॲक्ट 26/89.
क) महाराष्ट्र ॲक्ट 23/69 अर्थात आदिवासी भोगवटदाराचे शेततील झाडोरा (नियमन) 1969.
ड) महाराष्ट्र राज्य जमीन महसूल संहिता 1966.
2) इ) महाराष्ट्र राज्य जमीन महसूल संहिते अंतर्गत निर्मित नियमावली
प्रकरण 2 रे :- कार्यप्रणाली
1) संदर्भ प्रपत्र
2) अर्जदाराची अर्जनोंदणी

प्रपत्र-1 प्रपत्र अ
वृक्षतोड करण्यापूर्वी बाळगावयाची दक्षता
प्रपत्र-2(अ) 3अ,3ब,3क व ड
3) यांची तपासणी वृक्षतोड आदेश पारीत करण्यापूर्वी बाळगावयाची दक्षता प्रपत्र-4 अ, व प्रपत्र 5 व कार्यसंहिता
4) वृक्षतोड झाल्यानंतर वनौपजाची निर्गत प्रपत्र-5अ, 6, 6अ, व 7
5) पुर्तता अहवाल व मॉनिटरींग रजिस्टरमधे नोंद प्रपत्र क्र.8

प्रकरण 3 रे :- कालनिर्देशिका व कार्यप्रणालीतील प्रत्येक टप्यातील जबाबदार
शेतमालकी प्रकरणात होणा-या वृक्षतोडी संबंधी विहित कार्यप्रणाली व मार्गदर्शक तत्वे.

प्रकरण 1 ले :- वृक्षतोडी संबंधी अस्तित्वात असलेले कायदे व नियमावली.

अ) महाराष्ट राज्य झाडे तोड अधिनियम 1964
ब) महाराष्ट राज्य झाडे तोड अधिनियम (सुधारणा) 1989 महाराष्ट्र ॲक्ट नंबर 26/89
अ) शिर्षकाअंतर्गत नमूद केलेल्या कायद्याची 1989 मधे सुधारणा करण्यात आली व त्या कायद्यांना आता महाराष्ट्र राज्य झाडे तोड अधिनियम (सुधारणा) 1989 या नांवाने ओळखण्यात येते. या कायाद्यात केलेल्या सुधारणेनुसार वृक्षतोड करण्याचे अधिकार आता वृक्ष अधिकारी म्हणून वनपरिक्षेत्राधिकारी यांना शासनाच्या आदेश महसूल व वन विभाग क्रमांक टीआरएस-1089/1490/प्रक्र/323/86-फ-6 दि.29-11-89 नुसार नियक्त करण्यात आले आहे. या कायद्याच्या कलम 2 (फ) खाली अनुसुचिमध्ये विनिर्दिष्ट झाडे तोड करण्यासाठी वृक्ष अधिका-यांची परवानगी घेणे जरुरी आहे.

मुख्य अधिनियमाच्या कलम 3 (एक) अन्वये अर्जाची पोच दिल्यापासुन (तारखेपासून) किंवा अर्जाची पोच दिली नसल्यास आता 60 दिवसांच्या आत वनविभागाने निर्णय घेणे अगत्याचे आहे.

मुख्य अधिनियामांच्या कलम 3 (1-ब) नुसार आता वृक्ष अधिका-यास भोगवटदारांना तोड करण्यात आलेल्या झाडाऐवजी त्याच जातीचे किंवा अन्य प्रजातीचे वृक्ष,रोपे लावण्यास बाध्य करण्याचे अधिकार आहेत. भोवटदाराने जर या आदेशाची अंमलबजावणी केली नाही तर अशा जागेत कलक 3-अ नुसार रोपे लावून त्यावर झालेला खर्य वसूल करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र राज्य झाडे तोड अधिनियम 1964 याला मुख्य अधिनियम तर, महाराष्ट्र राज्य झाडे तोड (सुधारणा) अधिनियम 1989 याला झाडे तोड अधिनियम 1989 असे संबोधल्या जावे जेणे करुन विविध कलमाव्दारे प्राप्त झालेले अधिकार वापरतांना संदर्भ देता येतील.
सर्व वनाधिका-यांना प्रस्तुतच्या महाराष्ट्र ॲक्ट क्रमांक 26/89 अन्वये देण्यात आलेले अधिकार यांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा व त्यानुसार कार्यवाही करावी.

(क) महाराष्ट्र ॲक्ट नंबर 23/69 यालाच महाराष्ट्र राज्य आदिवासी भोगवटदारांच्या मालकी खस-यातील झाडांचे (नियमन) कायदा 1969 असे सुध्दा म्हणतात.

भोगवटदार जर आदीवासी असेल तर त्यांचे मालकी खस-यातील झाडांची विल्हेवाट या कायाद्याच्या तदतुदीनुसार लावावयाची आहे. यात एकूण 14 कलम असून महत्वाचे कलम 3,4 व 6 आहे. वनाधिका-यानी सदर कलमांचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी.

कलम नंबर 3 प्रमाणे भोगवटदारास कांही बाबी करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. उदा.भोगवटदार (योग्य अधिका-याकडून प्राप्त केलेल्या) पूर्वपरवानगीशिवाय मालकी खस-यातील उभ्या वृक्षांची तोड करु शकत नाही. महाराष्ट्र ॲक्ट नंबर 26/89 नुसार वृक्ष अधिकारी म्हणून वनपरिक्षेत्राधिकारी यांना या वृक्षतोडीस परवानगी देण्याचे अधिकार आहेत. अर्थात अनुसुचित विनिर्दिष्ट वृक्षांसाठीच वृक्ष अधिका-याचे अधिकार सिमित आहेत. खाली निर्दिष्ट केलेले वृक्ष अनुसुचित यादीमध्ये अंतर्भुत आहेत व त्यापुढे कंसात दाखविलेले आकडे गोलाईचे असुन त्याच गोलाईच्या वृक्षांना परिपक्व समजुन तोडीसाठी वृक्ष अधिकारी मंजूरी देईल. वृक्षांची यादी येणेप्रमाणे आहे. या यादीत शासन वेळोवेळी नविन प्रजातीच्या वृक्षांची भर घालील असते.किंवा अस्तित्वात असलेल्या यादीतून काही प्रजातींच्या वृक्षांचे नावे गाळण्यात सुध्दा येतात. वृक्ष अधिका-याने अशा अद्यावत वृक्ष यादींची माहिती मागवावी.

1) अनुसुचित वृक्षांची यादी खालील प्रमाणे आहे.
2) हिरडा (90 से.मि. च्या वर)
3) साग (60 से.मि. च्या वर)
4) मोहा (120 से.मि. च्या वर)
5) आंबा (180 से.मि. च्या वर)
6) चिंच (120 से.मि. च्या वर)
7) फणस (120 से.मि. च्या वर)
8) खैर (60 से.मि. च्या वर)
चंदन (60 से.मि. च्या वर)
9) बिजा (105 से.मि.च्या वर)
10) हलदु (105 से.मि.च्या वर)
11) तिवस (60 से.मि.च्यया वर)
12) अंजन (90 से.मि.च्या वर)
13) जांभुळ (120 से.मि.च्या वर)
14) येन (105 से.मि.च्या वर)
15) विंजल किंवा विंडसा (100 से.मि.च्या वर)

टिपः- सर्व फळझाडे वाळलेली किंवा पोकळ झालेली असल्यास वनसंवर्धनाच्या दृष्टीने धोकादायक असल्यास परिपक्व झाली आहेत असे समजावे.

(ड) महाराष्ट्र राज्या जमीन महसुल सहिता 1966 व त्यांचे सहितेच्या अंतर्गत निर्मीत करण्यात आलेल्या नियमानुसार मालकी प्रकरणांची विल्हेवाट लावण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य जमीन महसुल सहिंता 1966 कलम 25 नुसार मालकी खस-यातील मलकी जरी भोगवटदारांची असली तरी त्या मधील झाडे तोड करण्यासाठी शासनाने ठरविलेल्या नियमांचे उल्लंघन होणार नाही यांची खबरदारी वृक्ष अधिका-यांनी घेणे जरुरीचे आहे. अशी नियमबाहय कामे झाल्यास सबंधितांवर महाराष्ट्र ॲक्ट नं.26/89 नुसार कलम 4 अंतर्गत कार्यवाही करता येते.

कलम नं.25 नुसार महाराष्ट्र शासनाने शासनाचे जाहिरनामा क्रमांक युएनएफ-1567(ब)/आर दि.1/9/1967 तसेच युएनएफ-1567(ब)/आर दि.4/7/1968 नुसार मालकी व खस-यामधील नाल,आहोळ,झरा,तलाव इ. च्या किना-यापासुन 30 मिटर अंतरापर्यंत वृक्षतोड करु नये असे आहे.

तसेच तपासणी अधिका-यांनी शिफारस करतांना याच नियमांच्या पोअकलम 2,3 ची सुध्दा योग्य प्रकारे अमलबजावनी करणे आवश्यक आहे.

या शिवाय कलम 3 नुसार काही अपरिहार्य कारणासाठी वृक्षतोडीसाठी मंजुरीची शिफारस करावयाची आहे व वृक्ष अेधिका-यांनी त्यांची दखल घेणे अगत्याचे आहे. याच संबंधी महाराष्ट्र अॅक्ट नं.26/89 अंतर्गत कलम 3 मधील पोट कलम 1-ब मधील (ब) अंतर्गत नमुद केलेल्या कारणांची दखल वृक्ष अधिका-यांनी घ्यावयाची आहे.

वर नमुद केलेले कायदे व नियमावलीची योग्य प्रकारे दखल घेवुनच मालकी प्रकरणे निकाली काढण्यात यावी.

1) प्रकरणे 2 रेः- कार्यप्रणाली :-

अर्जदारंची अर्ज नोंदणी :-

मलकी खस-यातील झाडे तोडण्याची परवानगी प्राप्त करण्यास भोगवटदाराने

आपला अर्ज वनपरिक्षेत्र कार्यालयात सादर करण्यापुर्वी व त्या अर्जांची नोंदणी करण्यापुर्वी वनपरिक्षेत्र अधिका-यांनी भोगवटदाराकडुन प्रपत्र क्रमांक 1 व प्रपत्र क्रमांक (अ) मध्ये माहिती भरुन घ्यावी. या प्रपत्रात भरावयाच्या माहितीची जबाबदारी संपुर्णपणे भोगवटदांची असल्यामुळे जर प्रपत्रात कोणताही मुद्दा किंवा बाब या बद्यल माहिती अपुर्ण असल्यास प्रकरणाची नोंदणी करु नये. या प्रपत्रात बाब क्रमांक नुसार भोगवटदार जर भुमीधारी असल्यास जमीनीचे वाटप दिनांक 15/8/1967 पुर्वी झाले आहे याची खात्री करुन घेतली पाहिजे. बाब क्रमांक 2 (ब) नुसार 7/12 चे उता-यात संपुर्ण वृक्षा संबंधिची नोंद आहे किंवा नाही याची खात्री केली पाहिजे.

तसेच तोंड करण्यांत येणार्या वृक्षांची संख्या सुध्दा भोगवटदाराकडु ुन घेण्यांत यावी व ती माहीती त्याठिठकाणी नमुद करावी.

बाब कमांक 3(अ) मध्ये संबंधीत क्षेत्राचा नकाशा 1955 किकंवा त्यापुरवीचा असावयास पाहीजे जर भोगवटदार आदिवासी असल्यास तयांचे जातीचे प्रमाणपत्र तहसीलदाराचे कोर्टातुन घेण्यांत यावे व अशा व प्रमाणपत्राला प्रमाणित समजण्यांत यावे.

2) हे प्रपत्र वनपरिरक्षेत्र अधिकारी यांनी भोगवटदाराकडुुन पुर्णपणे सर्व बाबीची माहीती प्राप्त झाल्यावर प्रकरण कार्यालयातील रजिजष्टरमध्ये नोंद करावे व असे प्रकरण सहाय्यक वनसंरक्षक यांना 48 तासाचे आंत सादर करावे वत्याप्रमाणे कार्यालयातील कागदपत्रे तयार करण्यात यावे.

वृक्षतोड करण्यापूर्वी बाळगावयाची दक्षता :-

प्रपत्र 2 अ : मालकी खसर्यात झाडे तोड अधिनियम, 1964 नुसार अशी प्रकरणे वनपरिरक्षेत्र अधिकारी हे वृक्ष अधिकारी म्हणुन कार्य करीत असल्यामुळे े व व.प.अ. यांना दुहेरी भुमीका पार पाडावी लागत असल्यामुळे े त्यांनी निनयमानुसार 60 दिवसांचे बंधा पाळुुन सारासार विचार करुन व निनयमांची बुज बाळगुण कार्यवाही करावी. मालकी खसर्याचे लगत जर रक्षित/संरक्षीत वन असल्यास सिमांवन जिल्हा भुमी निरीक्षकाकडुुुन संयुक्तपणे करुन त्याप्रमाणे नकाशाच्या प्रती तयार करणे आवश्यक आहे.

या प्रपत्रामध्ये बाब कमांक 1 मध्ये केलेल्या सुचनांची खबरदारी घेतली पाहीजे. हे पपत्र सहा. परिरक्षेत्र अध्धिकारी यांचे मारफत योग्य प्रकारे भरुन घेण्यांत आले पाहिजे व त्यांनतर वनपरिक्षेत्र अधिकारी, यांनी पुढील कार्यवाही करावी.

प्रपत्र कमांक 2 अ मधील बाब कमांक 2 :- महाराष्ट जमीन महसुल संहिहता 1966 नुसार कलम 25 अन्वये शेतीस अयोग्य असलेल्या जमीनीवरील झांडोर तोडण्यास बंधन आहे . तसेच 25 चढ व उताराच्या जागी (जमीन) सुध्दा

वृक्षतोडीस मनाई आहे. मुरमाड, खाईग्रस्त व हलक्या प्रतीच्या जमीनीसुध्दा यापसुन वगळलेल्या आहेत. अशा ठिकाणी कमीत कमी 50 झाडे/हेकटरी असावीत असा दंड घालून दिला आहे. अशा परिस्थितीत फक्त परिरपक्त व वनसंर्धन दृष्टया अयोग्य अशीच झाडे तोडता येतात. तेंव्हा वृक्ष अधिकाऱ्यांनी यावर जास्त भर देवुन काळजीपुर्वक जमीनीची छाननी करुन कार्यवाही करावी व असे वृक्ष तोडीसाठी आदेश काढण्यासाठी कार्यवाही करावी.

या प्रपत्रातील बाब क्रमांक 3 :- उभ्या असलेल्या एकुण वृक्षाची संख्या जातवार नोंदवावी जेणे करुन बाब क्रमांक 2 नुसार वृक्षतोड करण्यांची कार्यप्रणाली ठरविता येते. शेती करण्याचे दृष्टीकोनातुन वृक्ष तोडण्यांची परवानगी देण्यांत येत असल्यामुळे शेती करणे किफायतशिर आहे किंवा नाही यांची खात्री करुनच वृक्ष तोडीसाठी योगय झाडाची शिफारस करण्यांत यावी. जर यापुर्वी वृक्षतोड मालकी खसऱ्यात झाली असल्यास त्याप्रमाणे तपासणी करण्यांत यावी. झाडे शेती करण्यांस अडवणीची आहेत किंवा कसे याबाबत विचार करुनच वृक्ष तोडण्यास शिफारस करण्यांत यावी.

प्रपत्र -2ध अध हे सहाय्यक परिक्षेत्र अधिकारी, यांनी तयार करावयाचे असल्यामुळे ही माहीती नेमकी व मुद्देसुद दिलेली आहे किंवा नाही यांची व प.अ. यांनी पुर्णपणे शहानिशा करुन हे प्रकरण सर्व कागदपत्रासह पुढील कार्यवाहीसाठी उपवनसरंक्षक/वि.व.अ.यांना सादर करावयाचे आहे.

प्रपत्र -3 (अ) :- विभागीय वन अधिकारी /उपवनसरंक्षक, यांचे कार्यालयातील राजस्व लेखापाल यानी प्राप्त झालेले सर्व कागदपत्रे अत्यंत बारकाईने तपासुन तयार करावयाचे आहे. यातील नोंदी हया केवळ अभिप्रायात्मक असल्यामुळे उपवनसंरंक्षक वि.व.अ. यांनी सर्व नियमावलीचा सखोल अभ्यास करुन योग्य ते निर्णय घ्यावे. सदरच्या प्रपत्रात राजस्व लेखापाल यांनी दिलेल्या अभिप्रायाचे आधारे योग्य निर्णय वि.व.अ/उप.व.सं.यांनी नोंदविणे आवश्यक आहे. जेणे करुन वृक्ष तोडीस अयोग्य असलेल्या प्रकरणांचा निपटारा कमीत कमी वेळेत म्हणजे 10 ते 15 दिवसाचे आंत सहजपणे शक्य होवून हरकतीचे तयार मुद्दे वृक्ष तोड अधिकाऱ्यांकडे पाठविता येतील. राजस्व लेखापाल सदरील प्रपत्राची माहीती सहाय्यक वनसंरक्षक, यांना सादर करतील.

प्रपत्र -3 (ब) :- प्रपत्र 3 (अ) मध्ये सहाय्यक वनसंरक्षक, यांनी दिलेल्या सुचनांचे आधारे योग्य अशा प्रकरणात पुढील कार्यवाही करीता उप.व.सं./वि.व.अ. हयांचे कार्यालयातील कक्ष अधिकारी, यांनी हे प्रपत्र भरावयाचे आहे. व तांत्रिक मुद्यांकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणुन सवितस्तर सुचना 1 ते 8 हयांची प्रपत्रात नोंद करावी

प्रपत्र 3 (ड) :- या प्रपत्रातील माहीती पुर्णपणे मुद्येसुद व.प.अ.यांनी भरावयाची आहे व ती त्यांनी तपासणी अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचे आहे.

प्रपत्र 4 :- हे प्रपत्र तपासणी अधिकाऱ्यांनी द्यावयाचे आहे. व.प.अ. यांचेकडुन मालकी खतऱ्यांसंबंधीची प्राप्त झालेली संपुर्ण कागदपत्रे तसेच त्या संलग्न इतर बाकीची योगय तपासणी केल्यानंतर तपासणी अधिकाऱ्यांनी (स.वं.सं.) या प्रपत्रामध्ये माहीती भरुन उपवसं./वि.व.अ.यांना सादर करावयाची आहे. यापुर्वी राजस्व खात्याचे अधिकाऱ्यांकडे वृक्षतोड करण्यासाठी आदेश पारी करण्यांचे अधकार असल्यामुळे त्यांना हे प्रमाणपत्र पाठवावे लागत होते. आता व.प.अ. यांनी वृक्ष अधिकारी, या नात्याने प्रकरणे हाताळवायावी असल्यामुळे सर्व प्रपत्राची माहीती वेळीच व योग्य प्रकारे भरल्यास प्रकरणे रेगंळणार नाही.

(3) वृक्ष तोड आदेश पारीत करतांना वृक्ष अधिकारी यांनी बाळगावयाची दक्षता व कार्यसंहिता.

प्रपत्र-4 (अ) :- वृक्ष अधिकारी या नात्याने व.प. अ.(प्रादेशिक) यांना महाराष्ट राज्य झाडे तोड (सुधारणा) अधिनियम 1989 (महारार्ष्ट ॲक्ट नंबर 26/89 नुसार) वृक्ष तोडीसाठी अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकाराची अंमलबजावणी करीत असतांना वन अधिकारी या नात्याने वनसंवर्धन हा मुख्य हेतु लक्षांत ठेवुन कमीत कमी वृक्ष तोड होईल यावर भर देण्यांत यावा.

मालकी खसऱ्यातील झाडे तोड करण्यास भोगवटदारास परवानगी देतांना भोगवटदाराकडुन जितकी वृक्ष तोड होणार आहे तेवढेच वृक्ष रोपे भोगवटदाराला त्याच जमीनीवर किंवा इतर योग्य जागेवर लावण्यास बांध्य

करण्याचे अधिकार वृक्ष अधिकार्यांस वृक्ष तोड (सुधारणा) अधिनियम, 1989 नुसार कलम (3) (1-ब) खाली प्राप्त झाले आहे तेव्हा या अधिकाराची सक्तीने अंमलबजावणी वृक्ष अधिकारी, म्हणुन व.प.अ. (प्रादेशिक) यांनी भोगवटदाराकडुन करुन घ्यावयाची आहे.

याशिवाय कलम ध3-अध अवये जर एखाद्या भोगवटदाराच्या जमीाीवर आवश्यक तेवढी वृक्ष सख्या नसेल तर कलम 15 अवये र्ाित करण्यांत आलेल्या मांपदंडानुसार तेवढी वृक्ष रोपे भोगवटदाराकडुन त्या जमीनीवर किंवा इतर नियोजीत जमीनीवर लावून घेणे वृक्ष अधिकारी (ध वनपरिक्षेत्र अधिकारीध याची जाबाबदारी आहे.

कलम 15 खाली दर एकरी किती रोपे असावी यासंबंधी सध्या महाराष्ट्र शासाााे ाियमावली तयार केली - नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य महसुल संहिता 1966 कलम नं.25 ाुसार मिळालेल्या अधिकाराखाली महाराष्ट्र राज्य शासनाने पारीत के ेल्या जी.आर. नुसार युएाएफ-1567 (बी) आर दिनांक 4.7.1968 नुसार दर हेक्टरी 57 वृक्ष असावेत असा दंडक घालून दिला आहे. त्यानुसार धवृक्ष अधिकार्यांनीध भोगवटदारा कडुा वृक्ष रोपांची लागवड करुा घ्यावी. जेणे करुन वृक्ष संख्या कमीत कमी 50 प्रती हेक्टरी होईल व झालेला खर्च भोगवटदारानी भागवावयाचा आहे. भोगवटदार किंवा त्यांचे हिस्सेदार यांना बंधनकारक आहे.

महाराष्ट्र राज्य झाडे तोड अधिनियम, (सुधारणा) 1982 नुसार वृक्ष तोड करण्यासाठी आदेश पारीत करण्यापुर्वी वृक्ष अधिकार्यांनी भोगवटदार कडुन प्रपत्र क्रमांक 4 (अ) मध्ये माहीती भरुन घ्यावी व त्यानंतरच वृक्ष तोडण्याचा आदेश पारीत करावा.

प्रपत्र-5 :- हे प्रपत्र वृक्ष तोडीचा आदेश पारीत करण्यासंबंधी असल्यामुळे व .प. यांनी वृक्ष अधिकारी या नात्यांनी संपुर्ण प्रकरणांत मुद्यांची योग्य ती माहिती प्राप्त करुा महाराष्ट्र झाडे अधिनियम, 1964 नुसार निर्धारित प्रपत्रात हा आदेश काढावा.

वनपरिक्षेत्र अधिकारी हा वृक्ष अधिकारी, म्हणुन आपले कर्तव्ये पार पाडीत असतांना त्यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर करण्यापुर्वी ओदश पारीत करण्यापुर्वी बर्याच कायदेविषयक तसेच न्यायिक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने बाबींचा विचार करुन त्यानुरुप कार्यवाही करावयाची आहे. उदा. भोगवटाराचा प्रकार तो भुमीधारी किंवा भुमीस्वामी आहे यांची निश्चिती झाली पाहिजे. भुमीधारी असल्यास त्याला खसरा वाटप 15 ऑगष्ट, 1967 नंतर झाला असेल तर अशा मालकी खसर्यांमधील झांडाची मालकी ही शासनाची असते व अशा झांडाची विल्हेवाट लावतांना वृक्षांचा (झाडांची) किंमत ठरविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, हे वनसंरक्षकांचे सल्ल्याने ठरवितां तेव्हा अशा प्रकरणात वनसरंक्षकातर्फे प्रकरण पुर्णपणे किंमती संबंधीत हाताळले गेले असेलच तर धवृक्ष अधिकारीध यांनी अशा प्रकरणाची दखल घेऊन पुढील कार्यवाही करावी. भुमीस्वामीचे नावाने जर खसरा असेल तर भोगवटराने मुखत्यारनामा लिहुन देतांना त्या खसर्यातील झांडाची रितसर विक्री केली आहे. किंवा नाही यांची खात्री केली पाहिजे. ए खसर्यांमध्ये जर अनेक भोगवटदार मालक असतील तर सर्वानी मुखतयारनामा संबंधीत कंत्राटदाराला विधायक कोर्टाकडून मंजुर करुन घेतला किंवा नाही यांची खात्री करणे आवश्यक आहे. रु. 5 स्टॅम्पवर फक्त जंगम मालमत्ता () विक्ता येते परंतु स्थावर () मालमत्तेची विक्री ही विक्री प्रपत्रानुसार झाली पाहीजे व अशाच रजिस्टरीने झालेल्या विक्री पत्राला योग्य दस्तावेज समजुन प्रकरणावर पुढील कार्यवाही करावी लागेल. खसरा मालकी मधील झांडांच्या विक्री बाबत सर्व संपत्ती संबंधीताच पत्र असणे आवश्यक आहे. सन 1972 ते 1975 च्या दरम्यान फेरमोजणी व जमा बंदी झाली असल्यामुळे खसरा क्रमांकात बदल झाले आहेत. तेव्हा व.प.अ. यांनी संबंधीत खसरा नंबर (जुना व नवा) यांचा ताळमेळ लावून त्याप्रमाणे नोंद घेतली आहे किंवा नाही यांची वृक्ष अधिकार्यांनी शहानिशा करावी. याला कारण म्हणजे व.प. वृक्ष अधिकारी, म्हणुन दोन्ही भुमीका तयानीच पार पाडावयाचया आहेत. तेव्हा त्या पूरक असाव्यात याची काळजी घ्यायला महाराष्ट्र राज्य जमीन महसुल संहिता 1966 कलम 25 अंतर्गत महाराष्ट्र शासनाने शासनाचा जहीरनामा काढुन वृक्ष तोडीसाठी निरनिराळया प्रकारात बंदी केली आहे. त्यानुसार वृक्षतोड करण्यासाठी आदेश पारीत करण्यापुर्वी वृक्ष अधिकार्यांनी तया नियमावलीचा अंगीकार केला पाहीजे जसे (1) नाले, ओहोळ, तलाव इतयादी पासुन 30 मीटर रुंदीचा पट्टा सोडून वृक्ष तोडीस परवानगी दिली पाहिजे (2) 25 उताराची

किंमत चढावाची जागा सुध्दा वृच्क्ष तोऊी पासुन वंचित की पाहिजे 3) जी जमीन शेती करण्याजोगी नाही अशा जमीनीवरील झाडे उदा. मुरमाड, हलकी, भरडी, इत्यादीवरील झाडे तोडण्यास बंदी करण्यांत यावी तसेच दर हेक्टरी 50 झाडे आहेत किंवा नाही यांची खाञी केल्यावर वृक्ष तोडीचा आदेश काढावा. कारण कमीत कमी 50 झाडे/ हेक्टरी असणे आवश्यक आहे. फायद्याची शेती करण्यासाठी जर संपुर्ण वृक्ष तोड करणा शिफारस करण्यांत आली तरी वृक्ष अधिकार्यांनी अशा प्रकरणात भोगवघ्टदाराकडुन तेवढीच (वृक्ष तोडीस मंजुर केलेली वृक्ष संख्ये एवढी) किंवा जास्त रोपे तयाच जमीनीवर किंवा इतरत्र लावून घेतली पाहीजे.

सदर वृक्ष तोड करण्यांचे आदेश पारीत करीत असतांना वृक्ष अधिकार्यांनी वनाधिकारी, या नात्याने कमीत कमी वृक्ष तोड होईल व भोगवटदारास सुध्दा योग्य न्याय मिळेल याची खाञी बाळगावी. वृक्ष तोडीची प्रकरणे मुख्यतः उत्तम शेती करण्याच्या उदेशाने भोग्वटदारानी सादर केलेली असतात तेव्हा मुळ हेतुला बगल देऊन नुसती वृक्ष तोड होणार नाही याची खाञी वृक्ष अधिकार्यांनी करावी. व्यर्थ तोड भोगवटदारास भविष्यात तयाच्या दैनंदिन जीवनात लागणारे सर्पण, शेतीविषयक अवजारे तयार करण्यासाठी लागणारे लाकुड यापासुन वंचित करणार असल्यामुळे वृक्ष तोडीचा आदेश पारीत करण्यापुर्वी या बाबीचा सुध्दा विचार होणे आवश्यक आहे. व वृक्ष अधिकारी तथा व.प. अ. यांनी पावर गंभर विचार करुनच आदेश पारीत करावेत. सन 1964 च्या शासन निर्णया प्रमाणे 7/12 मध्ये भोगवटदाराच्या उभ्या झांडाच्या मालकी संबंधी स्पष्ट उल्लेख असावयास पाहीजे, असा उल्लेख आहे किंवा नाही याबद्यल जसा व.प.अ. यांनी 7/12 अधिकार अभिलेख तपासावयाचा आहे तसी पुनः छाननी धवृक्ष अध्ािकारीध यांनी सुध्दा केली पाहीजे.

4) वृक्ष तोड झाल्यानंतर वनोपजांची निर्गत :-

प्रपत्र 5 अ :- वृक्ष अधिकारी व वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशीक हे एकच असल्यामुळे या प्रपत्रात माहिती व.प. अ. यांनी योग्य प्रकारे भरावी. मालकी खसर्यांचे बाहेर अवैध तोड झाली नाही यांची खत्री करुन त्याप्रमाणे प्रमाणपत्र द्यावे लागत असल्यामुळे प्रपत्र भरतांना विशेय काळजी घेणे आवश्यक आहे.

प्रपत्र 6 :- हे प्रपत्र उ.प.व.सं./वि.व.अ. यांनी भरावयाचे आहे व मालकी खसर्यांस मध्ये तोड करण्यांत आलेलया वृक्षापासुन तयार करण्यांत आलेल्या इमारती नगांची पासींग व निर्गत करण्यासाठी आदेश द्यावयाचा आहे. हा आदेश त्यांनी स.व.सं. यांनी द्यावयाचा आहे.

प्रपत्र 6 अ :- या प्रपत्राची पुर्तता नेमणुक केलेल्या सहाय्यक वनसंरक्षक, यांनी करावयाची आहे. राजपत्रित अधिकार्यांनी प्रपत्र -4 व 5 मध्ये नमुद केलेल्या अटीचे पुर्णपणे पालन केले किंवा नाही यांचा विशेष उल्लेख करावयाचा आहे. तसेच प्रपत्र-5 मध्ये दिलेलया वनोपजाचा अहवाल ताळमेळ बसवून तपासावयाचा आहे. सर्व वनोपजाचे पासींग करुन विवरण सादर करावयाचे आहे. निरीक्षण व पासींग एकाच अधीकार्यांने करावयाचे आहेत.

प्रपत्र -7 :- निर्गत परवाना आदेश उ.प.व.सं./ वि.व.अ. यांनी काढावयाचा आहे. तेव्हा या आदेशाची प्रत वि.व.अ./उप व.सं. यांना पाठवावी या प्रपत्रातील नोंदी बारकाईने व अचुक केल्या जातील यांची खाञी करावी.

5) पुर्तता अहवाल व मॉनीटरिंग रजिष्टरच्या नोंदी बाबत.

प्रपत्र-8 :- या प्रपत्राची माहीती व प.अ. यांनी वि.व.अ./उप.व.सं.यांना सादर करावी व यासाठी 15 दिवसाचे वर कालावधी देण्यांत येवू नये. प्रकरण बंद करण्यांत आले म्हणुन विभागीय कार्यालयात तसेच वनपरिक्षेत्र कार्यालयात नोंदी करण्यांत याव्यात.

प्रकरणे 3 रे :-    कालनिर्देशिका व कार्यप्रणालीतील प्रत्येक टप्प्यातील जबाबदार

| प्रपत्र क्रमांक | पुर्ण करण्याबाबतचा कालावधी | जबाबदार अधकारी |
|---|---|---|
| 1. | 2. | 3. |
| 1) प्रपत्र क्रमांक 1 व<br>प्रपत्र क्रमांक धअध | 2 दिवसांत | स.व.सं. यांनी विभागीय वनपरिक्षेत्र अधकारी<br>कार्यालयात सादर करावे |
| 2) प्रपत्र-2 धअध | 10 दिवस. | सहा.परिक्षेत्र अधीकारी वनपरिक्षेत्र अधिकारी |
| 3) प्रपत्र-3 धअध | 3 दिवस | राजस्व लिपलीक व स.वं.स. |
| 4) प्रपत्र 3धअध | 2 दिवस | कक्ष अधिकारी, विभागीय कार्यालय. |
| 5) प्रपत्र धइध धकध<br>प्रपत्र धइध धडध | 12 दिवस संयुक्त | वन सर्व्हेक्षक तपासणी अधिकारी.<br>प्रणाली (कच्र अधिकाऱ्यांनी) नेमणुक केला. |
| 6) प्रपत्र-4. | 6 दिवस | सहा.वनसंरक्षक, विभागीय कार्यालय. |
| 7) प्रपत्र-4 धअध | 3 दिवस | वृक्ष अधिकारी. |
| 8) प्रपत्र-5. | 10 दिवस | वृक्ष अधिकारी तथा व.प.अ. |
| | 12 दिवस | (सुरक्षा समय) |
| | एकुण 60 दिवस. | |

**प्रपत्राचा क्रमांक - 1.**
**मालकी खसरा प्रकरण**

शेतमालाचे नांव ----------------------------------- नोंदणी क्रमांक -------------------------------- खसरा नोंदणीवही अनु.क्रमांक --------------वर्ष.----------------------------------- गांवाचे नांव ------------------------------------ राजस्व हलका ------------------------- क्रमांक ----------------------- उपपरिक्षेत्र ----------------------------------------- दिनांक ---------------------------.

**प्रपत्र धअध कागदपत्रांची तपासणी**

1) क्षेत्र मालकी विषयी :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | अ) | संबधंीत क्षेत्रा भुमी अधिकारी अभिलेख प्राप्त झाला काय? | :- | होय/नाही |
| | ब) | सर्व मालकी हक्कदारांची नोद आहे काय असल्यास हक्कदारांची संख्या स्त्री पुरुष अल्पवयीन. | :- | होय/नाही |
| | क) | संबंधीत सर्व हक्कदाराने अर्जदाराचे नांव आवश्यक असलेला खास मुखत्यारनामा आणि संमतीपत्र दिले काय ? | :- | होय/नाही |
| | ड) | भोगवटदाराचा प्रकार भुमिधारी असल्यास जमीनीचे वाटप दि. 15.8.67 चे पुर्वी झाले आहे काय? | :- | भुमिधारी/भुमीस्वामी |
| 2 | (अ) | 7/12 उतार्‍यात प्रत्यक्ष शेती केल्याचे नोंद आहेत काय? असल्यास किती साला पासुन | :- | होय/नाही |
| | (ब) | 7/12 चे उतार्‍यात वृक्ष संखेची नोंदी आहे. असल्यास जातवार संख्या | :- | होय/नाही |
| | ब-1) | अर्जात तोड करावयाच्या झांडाचे विवरण दिले आहे काय? | :- | होय/नाही |
| | क) | संबंधीत क्षेत्रात उभ्या असलेल्या झांडावर शेत मालकीच्या हक्कबाबत स्पष्ट निर्देश आहेत काय? (1964 च्या शासन निर्णयाप्रमाणे 7/12 मध्ये नोंदी असणे आवश्यक आहे.) | :- | होय/नाही |
| 3 | (अ) | संबंधीत क्षेत्राचा अधिकृत नकाशा संदर्भासह प्राप्त झाले काय? व नकाशा परिपुर्ण आहे काय? | :- | होय/नाही |
| | (ब) | संबंधीत खसर्‍यांचे सिमांकन होवून प्रकरणात दिलेला तपशिल योग्य आहे यांचा दाखल राजस्व निरिक्षकाकडुन प्राप्त झाला काय? | :- | होय/नाही |
